| | |
|---|---|
| MHJN010018032023 | दाखल दिनांक –२९.०५.२०२३<br>नोंदणी दिनांक –२९.०५.२०२३<br>निकाल दिनांक – २४.०४.२०२६<br>कालावधी –०२वर्ष१०महिने२६दिवस |

**<u>सत्र न्यायाधीश, जालना यांचे न्यायालयात.</u>**

(पिठासीन अधिकारी – जी. आर. ढेपे, तदर्थ जिल्हा न्यायाधीश–१ तथा अति. सत्र न्यायाधीश)

**सत्र खटला क्र.१८०/२०२३** **नि.क्र.६७**

(प्रथम खबर अहवाल क्र. ४६२/२०२१)

(प्रथम खबर अहवाल दिनांक ३१/१०/२०२१)

(अपराध कलम – ३५३, १४३, १४६, १४९, ५०६ भादंवि व जमीन महसुल अधिनियमचे कलम ४८/७ व ४८/८ अन्वये शिक्षेस पात्र)

महाराष्ट्र शासन
तर्फे पोलीस निरीक्षक
पोलीस ठाणे तालुका जालना,
ता. जि. जालना. ... **<u>अभियोगपक्ष</u>**

**श्री.बी.के. खांडेकर, सहा. सरकारी अभियोक्ता.**

**– <u>विरुध्द</u> –**

१. बालाजी भिमराव पवार,
वय– ३६ वर्षे, रा. वडारवाडी,
खडकतलाव, जालना

२. सोमनाथ लक्ष्मण जाधव,
वय– ६२ वर्षे, रा. वरीलप्रमाणे

३. तुकाराम मल्हारी विटेकर,
वय– ६२ वर्षे, रा. वरीलप्रमाणे

४. प्रदिप विदयाधर वाघमारे,
वय– ३९ वर्षे, रा. संजयनगर
जुना जालना

५. शंकर बाबुराव पवार
वय– ४२ वर्षे, रा. वडारवाडी,
खडकतलाव, जालना

६. विष्णु विठठलराव पवार,
वय– ४४ वर्षे, रा. वरीलप्रमाणे ...**<u>आरोपी</u>**

**श्री. वाय.ए. खर्डेकर, आरोपींचे विधिज्ञ**

| | | |
|---|---|---|
| अपराध दिनांक | | १३/१०/२०२१ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | | १३/१०/२०२१ |
| दोषारोपपत्र दिनांक | | २१/०२/२०२२ |
| दोषारोप ठेवल्याची दिनांक | | ०८/०८/२०२३ |
| पुरावा आरंभ झाल्याची दिनांक | | ०९/०१/२०२४ |
| न्यायनिर्णयाची राखीव दिनांक | | ०९/१२/२०२५ |
| न्यायनिर्णय दिनांक | | २४/०४/२०२६ |
| शिक्षा लादलेली असल्यास दिनांक | | निरंक |

| क्र. | आरोपींचे नाव | अटक दिनांक | जामीन दिनांक | दोषारोप कलम | निर्दोष किंवा दोषी | लादलेली शिक्षा | कलम ४२८ फौ.प्र.सं. च्या उद्देशाने खटल्या दरम्यान अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | बालाजी भगवान पवार | ३१/१२/२०२१ | मा.उच्च न्यायालय औरंगाबाद येथे अटक पुर्व जामीन | ३५३, १४३, १४६, १४९, ५०६ भादंवि व जमीन महसुल अधिनियमचे कलम ४८/७ व ४८/८ | निर्दोष | निरंक | निरंक |
| २. | सोमनाथ लक्ष्मण जाधव | ३१/१२/२०२१ | -- | -//- | निर्दोष | निरंक | निरंक |
| ३. | तुकाराम मल्हारी विटेकर | ३१/१२/२०२१ | -- | -//- | निर्दोष | निरंक | निरंक |
| ४. | प्रदिप विदयाधर वाघमारे | ३१/१२/२०२१ | -- | -//- | निर्दोष | निरंक | निरंक |
| ५. | शंकर बाबुराव पवार | ३१/१२/२०२१ | -- | -//- | निर्दोष | निरंक | निरंक |
| ६. | विष्णु विठ्ठलराव पवार | ३१/१२/२०२१ | -- | -//- | निर्दोष | निरंक | निरंक |

## अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यादी –

| अ.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| अ.सा.–१ | अनिल भगवान पुरी | फिर्यादी |
| अ.सा.–२ | अनिल भावराव पाटील | पंच साक्षीदार |
| अ.सा.–३ | निलेश सुरेश शिरभाते | साक्षीदार |
| अ.सा.–४ | दुर्गेश गणेश गिरी | साक्षीदार |
| अ.सा.–५ | प्रेमानंद वामनराव लालझरे | साक्षीदार |

| | | |
|---|---|---|
| अ.सा.–६ | विश्वास रोहिदास पाटील | तपासी अंमलदार |

ब. आरोपीच्या साक्षीदारांची यादी – निरंक

क. न्यायालयीन साक्षीदार – निरंक

**निशाणी क्रमांकाची यादी –**

**अ. अभियोगपक्ष –**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १. | पी.१/पीडब्ल्यू१ | फिर्याद |
| २. | पी.१/पीडब्ल्यू२ | घटनास्थळ पंचनामा |
| ३. | पी.१/पीडब्ल्यू६ | तहसिलदार यांना पंचनामा करणेकामी दिलेले पत्र |
| ४. | पी.२/पीडब्ल्यू६ | नकाशा |

**ब. बचावपक्ष** – निरंक

**क. न्यायालयीन निशाणी –**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १. | १४ | दोषारोपपत्र |
| २. | १५ ते २० | आरोपींचे निवेदन |
| ३. | ५७ ते ६२ | फौ.प्र.सं. कलम ३१३ अन्वये आरोपींचे निवेदन |

**ड. मुद्देमाल** – निरंक

## न्यायनिर्णय

(पारीत दिनांक २४ एप्रील २०२६)

. आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम ३५३, १४३, १४६, ५०६ सहकलम १४९ व जमीन महसुल अधिनियमचे कलम ४८/७ व ४८/८ अन्वये खटला चालविण्यात आला आहे.

**<u>थोडक्यात अभियोगपक्षाचे कथन असे आहे की</u> –**

**२**. दिनांक १३/१०/२०२१ रोजी तहसिलदार श्रीकांत भुजबळ यांना माहिती मिळाली की, जालना शहरात वडारवाडी पाठीमागे गायरान जमीनीत मुरुम या गौण खनिजाचे उत्खनन करुन ते चोरटया मार्गाने विक्री करण्यासाठी नेत आहेत. त्यांनी सदर माहिती तलाठी दुर्गेश गिरी, भागवत वाघ, निलेश श्रीभाते यांना दिली. त्यावरुन ते सर्व जण सकाळी ८.०० ते ९.३० वाजेच्या सुमारास सदर माहितीच्या ठिकाणी गेले असता त्याठिकाणी काही जेसीबी मशीनद्वारे उत्खनन करुन ते टिप्परमध्ये भरत असतांना त्यांना पाहुन ते त्या ठिकाणावरुन पळुन वडारवाडी येथे गेले. त्यांनी तात्काळ पोलीसांना फोन करुन घटनास्थळी येण्याचे सांगीतले. थोडयाच वेळात तेथे सपोनि खाडे, पोहेकॉ प्रेमानंद लालझरे व वाहन चालक मोरे असे त्याठिकाणी आले. त्याठिकाणी लोकांचा जमाव जमा झालेला होता. ते त्यांना, आमचे जेसीबी व गाडया नेउ नका नाहीतर आम्ही दगडफेक करु असे म्हणुन जमलेल्या लोकांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन त्यांच्या अंगावर धावुन आले. त्यांनी जेसीबी व टिप्परवर कार्यवाही करु दिली नाही व त्यांच्या सरकारी कामात अडथळा निर्माण केला. सदर ठिकाणी एक पिवळया रंगाचा ट्रॅक्टर क्र. एमएच.२१.५६८४, एक पांढ–या लाल रंगाचा टिप्पर नंबर प्लेटवर एमएच.१४ व पुढचा नंबर पुसलेला, एक जेसीबी एमएच.२१.बीक्यु.४५२०, एक पिवळया रंगाचा जेसीबी ज्यावर मोबाईल नं. ९०४९७५०७७७, ८९९९०७७७२३ असे लिहलेला व एक पिवळया रंगाचा जेसीबी ३डीएक्स असे घेउन निघुन जात असतांना त्यांनी मोबाईलमध्ये त्यांचा फोटो काढला. त्यानंतर फिर्यादीने आरोपींविरुध्द प्रस्तुतची फिर्याद दाखल केली आहे.

**३**. सदर फिर्यादीवरुन पोलीस स्टेशन तालुका जालना येथे गुन्हा क्र.४६२/२०२१ दाखल होवून तपासकाम श्री. खाडे व तदनंतर स.पो.नि श्री.व्ही.आर.पाटील यांचेकडे दिला. श्री.खाडे यांनी घटनास्थळाला भेट देउन पंचनामा तयार केला. त्यानंतर गुन्हयाचा तपास श्री. व्ही. आर. पाटील यांच्याकडे वर्ग

झाला. त्यांनी दुस–या दिवशी साक्षीदारांचे तपासटीपण घेतले तसेच गाडीवरील चालक व हवालदार यांचे तपासटिपण घेतले. दिनांक २४/११/२०२१ रोजी तहसिलदार जालना यांना घटनास्थळ पंचनामा करणेकामी पत्र दिले. भुमि अभिलेख यांच्याकडे पत्र देउन नकाशा प्राप्त केला. त्यानंतर सुरेश खाडे यांनी उर्वरीत तपास करुन दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

**४**. भादंवि कलम ३५३ हे सत्र न्यायालयात चालविण्यात येत असल्याने, न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र. ३ जालना यांनी दिनांक १२/०४/२०२३ रोजी नियमित फौजदारी खटला क्र. २१०/२०२२ मध्ये नि.क्र. १ खाली आदेश करुन सदरचे प्रकरण जिल्हा न्यायालयात वर्ग करण्यात आले.

**५**. आरोपींविरुध्द ३५३, १४३, १४६, १४९, ५०६ भादंवि व जमीन महसुल अधिनियमचे कलम ४८/७ व ४८/८ गुन्हयांखाली दोषारोप (नि.क्र.१४) ठेवण्यात आला. त्यातील मजकूर आरोपींना वाचून दाखवला व त्यांनी गुन्हा नाकारला व संपरिक्षा करण्याची विनंती केली.

**६**. फौजदारी प्रकिया संहितेचे कलम ३१३(१)(ब) नूसार आरोपींचे जवाब (नि.क्र.५७ ते ६२) नुसार नोंदवण्यात आले. सदर केस खोटी दाखल केल्याचा बचाव आरोपींच्या वतीने घेण्यात आला.

**७**. अभियोग पक्षातर्फे अति. सरकारी अभियोक्ता श्री.बी. के. खांडेकर व आरोपींतर्फे विधिज्ञ श्री.वाय.ए.खर्डेकर यांचा युक्तिवाद ऐकला. खालील मुद्दे व त्यावरील निष्कर्ष कारणेमिमांसासह खालीलप्रमाणे आहे.

| **अ.क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दिनांक १३/१०/२०२१ रोजी सकाळी ८ ते ९ वाजताचे सुमारास मौजे वडारवाडी, ता.जि. जालना येथे सर्व | नाही. |

| | | |
|---|---|---|
| | आरोपीं व इतर अनोळखी १० ते १२ आरोपी असे मिळुन समान उद्येशाने गैरकायदयाची मंडळी जमवुन बेकायदेशीर जमाव जमवुन फिर्यादी व साक्षीदार, लोकसेवक यांना त्यांचे कर्तव्य पार पाडण्यापासून व परावृत्त करण्यासाठी त्यांच्यावर हल्ला किंवा फौजदारीपात्र बळप्रयोग केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले काय? | |
| २. | वरील तारीख, वेळ व ठिकाणी, यातील सर्व आरोपीं व इतर अनोळखी १० ते १२ आरोपी असे मिळुन समान उद्येशाने गैरकायदेशीर जमावाचे सदस्य झाल्याचे, अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | नाही. |
| ३. | वरील तारीख, वेळ व ठिकाणी, यातील सर्व आरोपींनी इतर अनोळखी १० ते १२ आरोपींसह समान उद्येशाने गैरकायदेशीर जमाव जमवुन दंगा केल्याचे, अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | नाही. |
| ४. | वरील तारीख, वेळ व ठिकाणी, यातील सर्व आरोपींनी इतर अनोळखी १० ते १२ आरोपीसह समान उद्येशाने गैरकायदयाची मंडळी जमवुन फिर्यादी व साक्षीदारांना जिवे मारण्याची धमकी दिल्याचे, अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | नाही. |
| ५. | वरील तारीख, वेळ व ठिकाणी, यातील सर्व आरोपींनी इतर अनोळखी १० ते १२ आरोपी तुम्ही वाहनामधून गौण खनिज रेतीची बेकायदेशीर वाहतूक केली आणि त्या वाहनासह पळून गेल्याचे, अभियोग पक्षाने सिध्द केले काय? | नाही. |

| | | |
|---|---|---|
| ६. | काय आदेश ? | आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येते. |

**<u>कारणमिमांसा</u>**

**<u>मुद्दा क्र.१ ते ५ करिता</u> –**

८. मुद्दा क्रमांक १ ते ५ हे एकमेकांशी निगडीत असल्याने एकत्रीतरित्या विचारात घेण्यात आले आहेत. सरकार पक्षाच्या युक्तीवादाप्रमाणे फिर्यादी हा त्याचे शासकीय कर्तव्य बजावत असतांना आरोपींनी गैरकायदयाची मंडळी जमवुन दंगा केला व त्यांच्या कर्तव्यात अडथळा निर्माण करुन त्यांना व साक्षीदारांना जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या. साक्षीदारांचा पुरावा फिर्यादीच्या पुराव्यास पुष्टी देणारा व विश्वास ठेवण्याइतपत पुरेसा आहे. आरोपींविरुध्द गुन्हयाशी संबंधीत पुरेसा पुरावा आहे.

**९.** आरोपींच्या विधिज्ञांनी युक्तीवाद केला की, आरोपींविरुध्द गुन्हयाशी संबंधीत ठोस पुरावा उपलब्ध नाही. प्रत्यक्षदर्शी व पंच साक्षीदारांचा पुरावा उपयुक्त नाही. तपासी अंमलदार यांचा पुरावा औपचारीक स्वरुपाचा आहे. तरी आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात यावे.

**१०.** आरोपींवर असा आरोप आहे की, दिनांक १३/१०/२०२१ रोजी रात्रीचे ८ ते ९ वाजताचे सुमारास मौजे वडारवाडी, ता.जि. जालना येथे फिर्यादीस व साक्षीदारास लोकसेवक म्हणुन त्यांचे कर्तव्य पार पाडण्यापासून व परावृत्त करण्यासाठी गैरकायदयाची मंडळी जमवुन हल्ला किंवा फौजदारीपात्र बळप्रयोग केला तसेच दंगा करुन फिर्यादी व साक्षीदारांना जिवे मारण्याची धमकी दिली.

**११**. फिर्यादी, अनिल भगवान पुरी( सा.क.१) यांच्या पुराव्यात असे आले आहे की, घटना दिनांक १३/१०/२०२१ रोजी सकाळी ९.०० ते ९.३० वाजता वडारवाडी वस्तीमध्ये घडली. तहसिलदार भुजबळ यांच्या फोनवरुन ते स्वतः,

तलाठी दुर्गेश गिरी, निलेश श्रीभाते असे वडारवस्तीच्या बाजुला गट क्र.४८६ मध्ये खदानावर गेले होते. तहसिलदार यांच्याकडुन त्यांना सदर गट क्रमांकामध्ये अवैध उत्खनन चालु असल्याची माहिती मिळाली होती. त्याठिकाणी जेसीबी व टिप्पर अशी वाहने होती, परंतु त्यांना पाहुन तेथील लोक सदर वाहने वस्तीवर घेउन गेले. तेव्हा ते त्याठिकाणी गेले असता तेथे बरेच लोक जमले होते. त्यांनी वाहन चालक यांना विनंती केली की, सदर वाहने तहसिल कार्यालय, जालना येथे घेउन चला. त्यावरुन त्यांच्यासोबत बातचीत झाली. त्यांनी पोलीसांना फोन केला. तिघेजण पोलीस आले होते. तेथील लोकांनी त्यांना वाहने नेण्यास मज्जाव केला. त्यानंतर ते तहसिल येथे गेले. तहसिलदार यांनी त्यांना फिर्याद देण्यास सांगीतले. त्यावरुन त्यांनी सदर फिर्याद दाखल केली.

**१२**. आरोपींतर्फे फिर्यादीची उलटतपासणी घेण्यात आली. त्यांच्या उलटतपासात असे आले आहे की, वडारवाडी येथे ते गेले असता त्यांना लांबुनच पाहुन ते लोक पळुन गेले. त्यामुळे ते कोणकोण लोक होते हे त्याला नक्की सांगता येणार नाही. वडारवाडी येथे भरपुर लोक जमा झाले होते. सदर साक्षीदाराच्या उलटतपासातील पुराव्यावरुन वडारवाडी येथे जमलेले लोक नक्की कोण होते अथवा ते आरोपी होते का, त्याबाबत अजिबात स्पष्टता नाही. आरोपींच्या वकीलांनी असा युक्तीवाद केला आहे की, सदर साक्षीदाराच्या पुराव्यात विसंगती आहे. त्यांनी न्यायालयासमोर केलेले प्रतिपादन व फिर्यादीमधील मजकुर यामध्ये विसंगती आहे. त्यांनी साक्षीदाराच्या उलटतपासावर लक्ष केंद्रीत केले. साक्षीदाराच्या पुराव्यात विसंगती दिसुन येत आहे. साक्षीदाराने त्यांच्या उलटतपासात असे प्रतिपादन केले आहे की, वडारवाडीच्या बाजुला गट क्र. ४८६ मध्ये अवैध उत्खनन चालु आहे, वाहने वस्तीवर थांबले होते, वाहनचालक यांना सदर वाहने घेउन तहसिल कार्यालय जालना येथे चला म्हटले असता त्यांच्यासोबत बातचीत झाली व त्यांनी वाहने नेण्यास मज्जाव केला, त्यांनी फोन करुन पोलीसांना बोलवले व नंतर तहसिल येथे गेले. परंतु सदर बाबी त्यांच्या फिर्यादीमध्ये प्रतिबिंबीत झालेल्या दिसुन येत नाही.

त्यामुळे सदर साक्षीदाराचा पुरावा सरकार पक्षाच्या कथनास परिणाम करणारा आहे. तसेच घटनास्थळी जाण्यापुर्वी अथवा जाउन आल्यानंतर त्यांनी तहसिल कार्यालयामध्ये हालचाल नोंदणीमध्ये घटनास्थळी जात असल्याबाबत कोणतीही नोंद केलेली नाही. अशा परिस्थीतीत इतर साक्षीदारांच्या पुराव्याचे अवलोकन करणे आवश्यक आहे.

**१३.** साक्षीदार क्र.४ दुर्गेश गिरी, तलाठी हा फिर्यादीसोबतचा कथीत प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहे. त्यांचा पुरावा जवळपास फिर्यादीच्या पुराव्यासारखाच आहे. त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, घटना दिनांक १३.१०.२०२१ रोजी वडारवाडी येथे घडली. ते फिर्यादीसोबत वडारवाडी येथे गेले होते. त्यांना अवैधरित्या मुरुमाचे उत्खनन चालु असल्याचे व त्याठिकाणी एक टिप्पर व जेसीबी असल्याचे दिसुन आले. त्यांना पाहुन ते वाहनासह पळुन गेले. त्यांनी त्यांचा पाठलाग केला असता वडारवाडी वस्तीजवळ काही लोक जमले होते. त्यांची फिर्यादीसोबत वादावादी झाली व ते बाजुला उभे होते. त्यानंतर ते तहसिल कार्यालयात निघुन गेले. सदर साक्षीदाराने त्याच्या पुराव्यादरम्यान न्यायालयात हजर असलेले आरोपी व फिर्यादीसोबत वादावादी करणारे आरोपी हे तेच होते का हे त्याला सांगता येणार नाही असे कथन केले. सदर कथनावरुन तेथे जमलेले लोकांपैकी आरोपी हे त्याठिकाणी होते किंवा नाही याबाबत साक्षीदाराच्या पुराव्यात ठामपणे व किंवा त्यांचे त्याबाबत निश्चीत कथन नाही.

**१४**. आरोपींतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात साक्षीदाराने कथन केले की, ते तहसिल कार्यालयात आल्यानंतर पोलीस ठाण्यात किती वेळांनी गेले हे त्यांना सांगता येत नाही, पोलीस त्याला कधी भेटले हे आठवत नाही. तसेच सदर साक्षीदाराने त्याच्या पुराव्यादरम्यान सांगीतलेल्या बाबी की, त्यादिवशी त्यांना तहसिलमध्ये फिर्यादीने बोलावले होते, आम्ही लोकांचा पाठलाग केला होता, तेथे वादावादी झाली तेव्हा ते बाजुला होतो, तेथुन ते सर्वजण तहसिलला निघुन गेले व तहसिलदार साहेबांनी पुरी साहेब यांना तक्रार देण्यास सांगीतले, या बाबी त्यांनी

पोलीसांना बयाण देतेवेळी सांगीतल्या नसल्याचे मान्य केले आहे. एकुणच सदर साक्षीदाराने त्याच्या पुराव्यात उपरोक्त वाढीव बाबी सांगीतल्या असुन त्यादिवशी खरोखरच ते फिर्यादीसोबत घटनास्थळावर गेले होते काय याबाबत शिवाय त्यांचा इतर पुरावा विसंगत असुन विश्वसनीय वाटत नाही.

**१५**. साक्षीदार क्र.३ निलेश सुरेश शिरभाते, हा साक्षीदार देखील तलाठी असुन दिनांक १३/१०/२०२१ रोजी तहसिल कार्यालय जालना येथे हजर असतांना तहसिलदार भुजबळ यांनी त्याला, दुर्गेश गिरी व भागवत वाघ यांना पुरी साहेंबासोबत जाण्यास सांगीतले. ते सदर ठिकाणी गेले असता तेथे एक टिप्पर व जेसीबी दुरुन दिसला व त्यांना पाहुन तेथील लोक वाहनासह पळुन गेले. त्यानंतर तेथे जमलेल्या लोकांसोबत त्यांची बाचाबाची झाली व ते त्यांना सदर टिप्पर व जेसीबी तहसिल कार्यालयात लावा असे म्हणत होते, परंतु ते ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. तेथे जमा झालेले लोक जास्त असल्याने तो आरोपींना ओळखु शकत नव्हते. पोलीसांनी त्यांचे बयाण घेतले नव्हते. बाचाबाची कोणासोबत झाली हे त्यांना सांगता येणार नाही. आरोपीच्या वतीने सदर साक्षीदाराचा उलटतपास घेण्यास नकार देण्यात आला. सदर साक्षीदाराच्या पुराव्याचे अवलोकन केले असता त्यांचा पुरावा मोघम व सर्वसाधारण स्वरुपाचा आहे. ते आरोपींना ओळखु शकत नाही. तेथे जमलेले लोक कोण होते हे त्यांना माहित नाही. अशापरिस्थीतीत खरोखरचा आरोपी त्याठिकाणी घटनेच्या वेळी उपस्थीत होते यावर संशय निर्माण होतो. त्यांच्या पुराव्यात आरोपींविरुध्द ठोस असे काही एक आलेले नाही. त्यामुळे त्यांचा पुावा सरकार पक्षास उपयुक्त स्वरुपाचा नाही.

**१६**. साक्षीदार क्र. ५ प्रेमानंद वामनराव लालझरे, कथीत प्रत्यक्षदर्शी पोलीस साक्षीदार असुन त्यांनी त्यांच्या पुराव्यात कथन केले की, दिनांक १३.१०.२०२१ रोजी ते तालुका जालना पोलीस ठाणे येथे कार्यरत असतांना एपीआय खाडे यांनी त्यांना वडारवाडी येथे मुरुमचे अवैध उत्खनन सुरु असल्याचे कळवल्यावरुन ते इतर पोलीस कर्मचा–यासह वडारवाडी येथील खदानीजवळ गेले. त्याठिकाणी मंडळ

अधिकारी श्री. पुरी व त्यांचे इतर कर्मचारी हजर असतांना दहा ते बारा लोक त्यांच्या शासकीय कामात अडथळा आणुन त्यांच्यासोबत वादविवाद करीत होते. त्यानंतर त्यांना पाहुन आरोपी ३ जेसीबी व २ हायवासह पळुन गेले.

**१७.** आरोपींतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी असे कथन केले आहे की, फोन आल्यानंतर घटनास्थळावर निघण्यापुर्वी स्टेशन डायरीला नोंद घेतली किंवा नाही, तसेच मंडळ अधिकारी यांची टीम किती अगोदर तेथे हजर होती हे त्यांना सांगता येत नाही. तसेच खदान व वडारवाडी वस्तीमध्ये थोडे अंतर असुन खदान ही डांबरी रोडपासुन ब–याच अंतरावर असल्याचे कथन केले. तसेच सदर साक्षीदाराने त्याच्या उलटतपासात त्याच्यासमक्ष कोणतीही घटना घडली नसल्याचे मान्य केले आहे. त्यामुळे सदर साक्षीदार हा घटनेचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार दिसुन येत नाही. तसेच त्यांचा पुरावा फिर्यादीच्या पुराव्याशी उलटपक्षी आहे. त्यांच्या पुराव्याप्रमाणे ते वडारवाडी येथील खदानीजवळ गेले असता त्याठिकाणी फिर्यादी व त्यांचा कर्मचारी हजर होते व १०–१२ लोक त्यांना शासकीय कामात अडथळा आणुन त्यांच्या वादविवाद करीत होते. वास्तविक पाहता फिर्यादीच्या पुराव्याप्रमाणे सदर घटनास्थळ हे वडारवाडी येथील असुन त्याठिकाणी लोक जमले होते व त्यांच्या वादविवाद करीत होते. परंतु सदर साक्षीदाराने घटनास्थळ हे वडारवाडी येथील नसुन खदानीजवळ नमुद केले आहे. तसेच त्यांनी त्यांच्यासमक्ष कोणतीही घटना घडली नसल्याचे स्पष्टपणे मान्य केले आहे. यावरुन त्यांचा पुरावा सरकार पक्षास उपयुक्त दिसुन येत नाही तसेच फिर्यादीच्या पुराव्याशी विसंगत आहे.

**१८.** साक्षीदार क्र. ६ विश्वास रोहिदास पाटील, यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दिनांक १३/१०/२०२१ रोजी सहा. पोलीस निरीक्षक म्हणुन जालना पोलीस ठाणे येथे कार्यरत असतांना त्यांच्याकडे गु.क्र.४६२/२०२१ चा तपास देण्यात आला. सदर दिवशी ते अतिक्रमण बंदोबस्तावर असल्याने स.पो.नि.सुरेश खाडे यांनी घटनास्थळ पंचनामा केला व त्यानंतर त्यांनी तपासाची कागदपत्रे त्यांच्याकडे सुपुर्द केली. त्यानंतर त्यांनी साक्षीदारांचे बयाण त्यांच्या म्हणण्याप्रमाणे नोंदवले, आरोपींचा

शोध घेतला, तहसिलदार यांना घटनास्थळ जागेचा सातबारा उतारा तपासकामी मिळणेसाठी विनंती पत्र दिले, भुमि अभिलेख कार्यालयाला पत्र देउन घटनास्थळ नकाशा रेखांकन प्राप्त केला. पुढील तपास श्री. सुरेश खाडे यांनी केला व दोषारोपपत्र दाखल केले. त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्यांनी आरोपींना पाहिले नसुन ते त्यांना ओळखत नाहीत.

**१९.** आरोपींच्या वतीने सदर तपासी अंमलदाराची उलटतपासणी घेण्यात आली. सदर तपासणी अंमलदाराने केवळ साक्षीदाराचे बयाण नोंदविल्याचे दिसुन येत आहे व संबंधीत कार्यालयांना पत्र देउन सातबारा उतारा व घटनास्थळाचे रेखांकन मागीतल्याचे दिसुन येत आहे. याशिवाय त्यांनी इतर कोणताही तपास केल्याचे दिसुन येत नाही. तसेच त्यांनी आरोपींला पाहिल्याचे दिसुन येत नाही. विशेष बाब म्हणजे सरकार पक्षाच्या कथनाप्रमाणे साक्षीदारास घटनास्थळावर पिवळया लाल रंगाचा टिप्पर, जेसीबी आढळुन आल्याचे नमुद केले आहे, परंतु सदर वाहने प्रकरणात जप्त केलेली नाहीत अथवा त्याबाबत कोणताही सविस्तर पुरावा प्रकरणात दाखल केलेला नाही. तसेच त्याठिकाणी जमा झालेल्या कोणत्याही प्रत्यक्षदर्शी इसमाचे बयाण नोंदविलेले नाही अथवा त्यांचा पुरावा दिलेला नाही. शिवाय त्यांनी आरोपींना प्रत्यक्ष पाहिल्याचे दिसुन येत नाही. अशा परिस्थीतीत साक्षीदाराचा पुरावा औपचारीक स्वरुपाचा दिसुन येत आहे.

**२०.** साक्षीदार क्र.२ अनिल भावराव पाटील, तलाठी, राजावाडी सज्ञा, यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दिनांक १३/१०/२०२१ रोजी ते जालना शहरात कार्यरत असतांना सदर दिवशी पोलीसांनी त्यांना वडारवाडी येथे गायरान जमीनीवर बोलावले होते. त्यांच्यासोबत दुसरे पंच श्री.काशीकर, तलाठी हजर होते. ते वडारवाडी वस्ती येथे गेले असता तेथे पोलीसांना त्यांना मुरमाचे खडडे व गाडयांच्या चको–या पडलेल्या दाखवल्या. तेथे फिर्यादी हजर होते. पोलीसांनी घटनास्थळ पंचनामा केला व त्यावर त्यांनी वाचुन सहया केल्या. आरोपींतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात सदर साक्षीदाराने त्याला पोलीसांनी पत्र देउन बोलावले नसल्याचे व

तलाठी हे पद मंडळ अधिकारी व तहसिलदार यांच्या अधिनस्त पद असल्याचे मान्य केले. परंतु सदर साक्षीदाराचा पुरावा पाहता त्याने घटनास्थळावर मुरुमाचे खडडे पडलले होते व त्यांच्यासमक्ष पंचनामा केल्याचे स्पष्ट कथन केले आहे. पंचनामा नि.क्र.पी.१/पी.डब्ल्यु.२ त्यांच्या पुराव्यात योग्यरित्या सिध्द झाल्याचे दिसुन येत आहे. आरोपींच्या वतीने त्यांना घटनास्थळासंबंधात उलटतपासात काही एक सुचीत करण्यात आले नाही. जरी तपासीक अंमलदार श्री. खाडे यांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला असला तरी व जरी त्यांना तपासण्यात आले नसले तरी सदर पंच साक्षीदाराचा पुरावा व पंचनाम्यातील मजकुर योग्यरित्या सिध्द होत आहे. पंचनाम्यातील मजकुराप्रमाणे घटनास्थळी मोठे खडडे, वाहनाच्या चाको–या व खदान दिसुन येत आहे. घटनास्थळ पंचनाम्यातील सिध्द होत आहे.

**२१**. जरी कथीत घटनास्थ्ळ हे सिध्द होत असले तरी साक्षीदारांच्या पुराव्यात घटनास्थळ हे सदर नसुन ते वडारवाडी येथे घडल्याचे नमुद केले आहे. प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांच्या पुराव्यात एकवाक्यता व सुसंगती नाही. घटनेच्या इतर प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचा पुरावा उपलब्ध आहे. उपलब्ध पुरावा आरोपींविरुध्द गुन्हयाशी संबंधीत उपयुक्त नाही. अशा परिस्थीतीत आरोपींनी गैरकायदयाची मंडळी जमवुन साक्षीदारांच्या सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याचे, दंगा केल्याचे अथवा आरोपींनी शासनाची परवानगी न घेता सदर जमीनीतुन गौण खनिज रेती, दगड व माती ई. बेकायदेशीर काढुन त्यांची विल्हेवाट लावली, याबाबी सिध्द होत नाहीत. गुन्हयाचे मुख्य घटक सिध्द झालेले नाहीत. म्हणुन मुददा क्र. १ ते ५ ची उत्तरे नकारार्थी देण्यात येत आहेत.

**<u>मुद्दा क्र.०६</u>**

**२२**. वरील विवेचनावरुन अभियोगपक्ष आरोपींविरुध्दचे आरोप सिध्द करण्यास संशयरहित पुरावा आणण्यास अपयशी ठरला आहे. त्यामूळे आरोपींविरुध्द गुन्हा संशयापलीकडे सिध्द झालेला नाही. म्हणून मुद्दा क्रमांक ५ करिता खालील प्रमाणे

आदेश पारीत करत आहे.

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १. | आरोपी क्र. १ ते ६ यांना भारतीय दंड विधान कलम ३५३, १४३, १४६, १४९, ५०६ भादंवि व जमीन महसुल अधिनियमचे कलम ४८/७ व ४८/८ या आरोपांमधून फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २३५(१) नुसार निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |
| २. | आरोपींचे जातमुचलके व बंधपत्र रद्द करण्यात येत आहेत. |
| ३. | आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) नूसार प्रत्येकी रक्कम रुपये ५,०००/- चे बंधपत्र व जामीनपत्र दाखल करावे. सदरचे बंधपत्र व जामीनपत्र हे पूढील सहा महिन्याच्या कालावधीसाठी कायम ठेवण्यात येतात. |

Digitally signed by GURLING RAMLING DHEPE
Date: 2026.04.24 16:07:55 +0530

दिनांकः२४/०४/२०२६ **( जी. आर. ढेपे )**

तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१ तथा
अतिरिक्त सत्र न्यायाधीश, जालना.

**<u>प्रमाणपत्र</u>**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील शब्द मुळ निकालपत्राप्रमाणे बरोबर आहे.

लघुलेखकाचे नांव – एस.एस. खंडारे, लघुलेखक (ग्रेड-३)

न्यायालयाचे नांव – तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१ तथा अति. सत्र न्यायालय

स्वा/-
लघुलेखक